मंगळवार, दि. १८ मार्च २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २२५ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# प्रभारी कारभारामुळे विकास कामांवर परिणाम, रिक्त जागा तात्काळ भरा - आ. बबनराव लोणीकर

## वाळु चोरी अन् पोलीसांची बघ्याची भूमिका, वाळू धोरण, झाडांची कत्तल, शेतीसाठी जोडधंदा, शाळा खोल्यांसह स्वच्छतागृहे; आमदार लोणीकर विधानसभेत आक्रमक

**मुंबई । प्रतिनिधी** - सामान्य प्रशासन विभागाच्या मार्फत अनेक विभागांच्या जागा रिक्त असल्यामुळे प्रचंड मोठी अडचण होत असून एकाच व्यक्तीकडे अनेक विभागांचा चार्ज देण्यात आलेला असतो परिणामी सर्वसामान्य जनतेची कामे खोळंबली असून जोपर्यंत रिक्त जागेचा अनुशेष भरून निघत नाही तोपर्यंत विकास कामांना व सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्याच्या कामाला गती मिळणार नसल्याचे म्हणतांनाच वाळु चोरी अन् पोलीसांची बघ्याची भूमिका, वाळू धोरण, झाडांची कत्तल, शेतीसाठी जोडधंदा, शाळा खोल्यांसह स्वच्छतागृहे अशी शहरी व ग्रामीण भागातील कैफियत आमदार बबनराव लोणीकर यांनी विधीमंडळात मांडली. अधिवेशन सत्र सुरु झाल्यापासून मतदार संघातील विविध मुद्द्यांवर आमदार लोणीकर विधानसभेत आक्रमक भूमिका मांडतांना दिसून येत आहे.




गटविकास अधिकारी गटशिक्षणाधिकारी यांच्यासह तलाठी ग्रामसेवक कृषी सहाय्यक सार्वजनिक बांधकाम विभागापासून ते पाणीपुरवठा विभागापर्यंत अनेक शाखा अभियंता यांच्याकडेच उपअभियत्याचा तर काहींकडे कार्यकारी अभियंताचा देखील पदभार सोपवण्यात आला आहे मनुष्यबळ उपलब्ध नसल्यामुळे शासनाकडून मंजूर करण्यात आलेला निधी देखील खर्च करणे अवघड होऊन बसले आहे जिल्हाधिकारी कार्यालयापासून गाव पातळीपर्यंतच्या कार्यालयांपर्यंत सर्व ठिकाणी प्रभारी अधिकाऱ्यांवर काम चालवावे लागत आहे परिणामी विकास कामांवर प्रचंड मोठा परिणाम होत असून या बाबीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही असे मत माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज विधिमंडळात व्यक्त केले.

पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सर्वसामान्य जनतेला स्वच्छ पाणी मिळावे यासाठी जलजीवन मिशनच्या माध्यमातून हरभर जल ही संकल्पना राबविण्यात येत आहे परंतु प्रत्यक्षात मात्र अधिकारी कर्मचाऱ्यांची कमतरता असल्यामुळे पाणीपुरवठा विभाग ही योजना सक्षमपणे राबवू शकत नाही पाणीपुरवठा विभागाच्या शाखा अभियंताकडे तर काही ठिकाणी कार्यकारी अभियंताचा प्रभार देण्यात आलेला आहे परिणामी सर्वसामान्य नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळण्यासाठी मोठा अडथळा निर्माण होत आहे त्यामुळे या सर्व रिक्त जागा तात्काळ भरण्यासाठी शासनाने प्रयत्न करावे अशी मागणी देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी विधानसभेत केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टी नेतृत्वाच्या माध्यमातून प्रधानमंत्री आवास योजना रमाई आवास योजना शबरी आवास योजना यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना अहिल्यादेवी होळकर आवास योजना शबरी आवास योजना या घरकुलांच्या योजनांच्या माध्यमातून प्रत्येकाला घर मिळावे यासाठी शासनाच्या वतीने प्रयत्न केले जात आहेत परंतु या घरकुलांसाठी मिळणारी वाळू मोफत देण्याचा शासनाचे धोरण असताना देखील प्रत्येक जिल्ह्यामध्ये केवळ एकच ठिकाण मोफत वाळूसाठी ठरवून दिलेले आहे त्यामुळे घरकुलासाठी मोफत मिळणारी वाळू सर्वसामान्य लाभार्थ्यापर्यंत पोहोचण्यासाठी खूप मोठा अडथळा निर्माण झाला आहे एकीकडे शासकीय योजनांसाठी वाळू मिळत नाही आणि या उलट जिल्हाभरातून १००० पेक्षा अधिक हायवा च माध्यमातून बाहेरच्या जिल्ह्यात मध्ये अवैध वाळू विक्री केली जाते या गोष्टीकडे जिल्हाधिकारी उपविभागीय अधिकारी तहसीलदार मंडळ अधिकारी तलाठी पोलीस प्रशासन यांचे अक्षम्य दुर्लक्ष होत असून आर्थिक देवाण-घेवाणीतून हेतू पुरस्सर हे दुर्लक्ष केले जाते आहे असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी विधानसभेत म्हणाले.

पोलीस प्रशासन अवैध वाळूच्या बाबतीत केवळ बघ्याची भूमिका घेत असून तहसीलदार मंडळ अधिकारी तलाठी उपजिल्हाधिकारी यासारख्या मोठ्या पदावरच्या व्यक्तींवर थेट वाळूमाफियांनी हल्ले केले तरी देखील पोलीस प्रशासन दुर्लक्ष का करत आहे हा खरा प्रश्न आहे? जालना जिल्ह्यातील घनसावंगी तालुक्यामध्ये कुठल्याही प्रकारची निविदा झालेली नसताना दररोज ५०० पेक्षा जास्त हायवा अवैध वळू उपसा करून घनसावंगी तीर्थपुरी व गोंदी या तीन पोलीस स्टेशनच्या हद्दीतून वाळू चोरून घेऊन जातात तरी देखील या ठिकाणी पोलीस प्रशासन केवळ बघायची भूमिका घेत आहे त्यामुळे शासनाचा महसूल तर बुडतो आहेच परंतु शासकीय योजनांसाठी शासनाच्या वतीने देण्यात येणारी मोफत वाळू मिळणे दुरापास्त झाले आहे. एकीकडे शासकीय योजनांसाठी वाळू नाही अशी प्रशासन आपली भूमिका मांडत असतानाच प्रशासनाच्या नाकावर टिचून हजारो हायवा दुसऱ्या जिल्ह्यात अवैध वाळू विक्री करतात ही बाब अत्यंत गंभीर असून याकडे शासनाने प्रचंड गांभीर्याने बघणे आवश्यक आहे असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

वाळूच्या धोरणामध्ये बदल करणे आवश्यक असून तेलंगणा व आंध्र प्रदेश मध्ये ज्या ग्रॅनाईटच्या खाणी आहेत त्या खाणींच्या माध्यमातून देशभरातील विमानतळांना ग्रॅनाईट पुरवण्याचे काम केलं जातं परंतु सर्व काम ऑनलाईन पद्धतीने असल्यामुळे एक ब्रास सुद्धा चोरी या ठिकाणी होत नाही परिणामी त्या ठिकाणचे धोरण महाराष्ट्र सरकारने अवलंबिल्यास शासनाची वाळू चोरी थांबेल व शासनाला अधिकाधिक महसूल देखील मिळण्यास मदत होईल शासकीय काम काजासाठी लागणारी वाळू तात्काळ मिळण्याची सुविधा उपलब्ध होईल त्यामुळे महाराष्ट्र सरकारने वाळू धोरणामध्ये बदल करून तेलंगणा व आंध्र प्रदेशच्या धर्तीवर वाळू धोरणाचा अवलंब करावा अशी मागणी देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी विधिमंडळात केली.

जालना जिल्ह्यासह मराठवाड्याची वाळवंट झाले असून दररोज हजारो झाडांची कत्तल केली जात आहे अशा परिस्थितीत वनविभाग व सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने अत्यंत गांभीर्याने काम करणे आवश्यक असून प्रत्यक्षात होणारी सर्व चोरी व वृक्षतोड थांबवण्यासाठी कठोर पावले उचलण्याच्या आवश्यकता आहे. जालना जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल केली जात **पान ३ वर**

# शेतकऱ्यांना ऊसाची एफआरपी एकरकमी देण्याचे मा. उच्च न्यायालयाचे सरकारला आदेश

**मुंबई** - राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देणारी बातमी असून आता शेतकऱ्यांना एक रक्कमी एफआरपीची रक्कम देण्याचा आदेश उच्च न्यायालयाने दिला आहे. शेतकऱ्यांना ऊसाची एफआरपी एक रक्कमीच द्या, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत. राज्य शासनाचा यासंदर्भातला आदेश मुंबई उच्च न्यायालयाकडून रद्द करण्यात आला आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी लढणारे स्वाभीमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांच्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाने हे आदेश दिले आहेत. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊस बिलाची एफआरपी टप्प्याटप्प्याने देण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला होता. मात्र, आता न्यायालयाने शासनाचा हा निर्णय रद्द ठरवला आहे. हायकोर्टाच्या या निर्णयामुळे राज्यभरातील ऊस शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

राज्यात महाविकास आघाडीचं सरकार असताना ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्रासदायक ठरणारा आणि कारखानदारांना दिलासा देणार निर्णय घेण्यात आला होता. या निर्णयाविरुद्ध शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. यासंदर्भातील याचिकेवर आज न्यायालायत सुनावणी झाली. न्यायालयाने याचिकाकर्त्यांच्या बाजुने निर्णय देत शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे.

राज्यात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीचे सरकार असताना तुकड्या तुकड्याने एफआरपी देण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयामुळे एफआरपी देण्याच्या पद्धतीत जो बदल केला होता तो निर्णय आम्ही पूर्ववत करून सगळ्या साखर कारखानदारांना चारी मुंड्या चीत केलेले आहे, असं स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी हायकोर्टाच्या निर्णयानंतर म्हटलं. कारखानदारांच्या दबावाला बळी पडून मविआ सरकारने तुकड्या तुकड्याने एफआरपी देण्याचा निर्णय त्यावेळी घेतला होता, असेही शेट्टी यांनी म्हटले. दरम्यान, राज्यातील **पान २ वर**

शिक्षक आणि शिक्षण विरोधी धोरणाने धनंजय नागरगोजे यांचा बळी!

# विनाअनुदानित, अंशत: अनुदानित शाळांना अनुदान देऊन शिक्षकांची वेठबिगारी संपवा!

## मराठवाडा शिक्षक संघाची मागणी!

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी** - अठरा वर्षे विनावेतन काम करणाऱ्या शिक्षकांने इतक्या दीर्घ काळापासून वेतन नसल्याने मी हतबल झालो आहे, काय करू असे संस्थाचालकास विचारले असता फाशी घेण्याचा सल्ला त्यांनी दिला. त्यामुळे निराशेच्या प्रचंड गर्तेत सापडलेल्या धनंजय नागरगोजे नावाच्या शिक्षकाने फेसबुक पोस्ट करून आपल्या 'चिमुकल्या मुलीची' माफी मागून गळफास घेऊन आपली जीवन यात्रा संपविली. मृत्यूस जबाबदार असलेल्या लोकांची यादी त्यांनी फेसबुक पोस्ट मधून दिली आहे. शासन, प्रशासन आणि संस्थाचालकांनी घेतलेला हा बळी असून संस्थाचालक व शासनावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम यांनी केली आहे.

मराठवाडा शिक्षक संघाने याबाबत दिलेल्या प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे की, दिवंगत शिक्षक धनंजय नागरगोजे यांची फेसबुक पोस्ट हृदय पिळवटून टाकणारी आहे. विनाअनुदान धोरण हा पुरोगामी महाराष्ट्राला लागलेला कलंक आहे. धनंजय नागरगोजे अठरा वर्षांपासून विनावेतन काम करीत होते. वेतन नसल्याने आपले आई वडील पत्नी मुले यांच्या ईच्छा पूर्ण करू शकत नसल्याची भावना त्यांच्या मनामधे निर्माण झाली होती. महाराष्ट्रात पाव शतकांपासून सुमारे पासष्ट हजार शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विनावेतन वा अंशत: वेतनावर राबवून घेतले जात आहेत. याच लोकांच्या जीवावर देश महासत्ता बनणार आहे. परंतु सुमारे पाव शतकांपासून हे लोक कसे जगत **पान २ वर**

युवा आदर्श

**शिवराय ...**

शिव राज्याभिषेकी
उत्साह सळाळेरक्ती
पाऊले चालून येती
कुठली नसता सक्ती
सर्व धर्मीय जमती
असे चमत्कारी नाती
शिवांचे मित्र मावळे
एकचि उरली जाती
लहान थोर कुणाही
मना मनात छत्रपती
उत्सव तयारी करता
अभिमाने रूंदे छाती
मधेचं आली दिवाळी
ज्योती उजळे ज्योती
किल्मिशे सर्वजळती
कुठून मिळते स्फुर्ती
भासते आशीष देती
शिवबा जीवंत मुर्ती
परदेशी उत्सव चाले
दिगंतरा जाय किर्ती
रायगडा जाया मिळे
कपाळा शोभवू माती
सद्वर्तन करुन सदैव
शिवबाशी जोडू नाती

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# पाटोद्याच्या विद्यार्थ्यांनी घेतली जालन्यातील विविध ठिकाणांची माहिती




**जालना । प्रतिनिधी** - विद्यार्थ्यांना विविध ठिकाणांची प्रत्यक्ष माहिती मिळण्यासाठी शालेय जीवनात क्षेत्रभेटीचे आयोजन केले जाते. पाटोदा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील अनंता चव्हाळ, रुद्र वायाळ, रुद्रांश जोशी, सौरभ नजान, समर्थ काळे, समर्थ गोरे, माधुरी बोराडे व अक्षरा परभने या पहिलीच्या विद्यार्थ्यांनी क्षेत्रभेटी अंतर्गत १७ मार्च, २०२५ रोजी जालन्यातील विविध सांस्कृतिक, व्यावसायिक, ऐतिहासिक आणि प्रशासकीय ठिकाणांना भेट देऊन वर्ग शिक्षक गंगाधर वानोळे यांच्यासोबत माहिती घेतली. जालना ऐतिहासिक मस्तगड व मंठ्याच्या अर्थात उंबरखेडच्या किल्ल्यास भेट देऊन माहिती घेतली. छत्रपती संभाजी उद्यान अर्थात मोती बाग आणि **पान २ वर**

दीपसन रेमेडी
http://exclusivemaharashtra.com/
https://www.lokadhikarlive.com/
https://arjunastra.in/
वृत्तपत्रे (दैनिक, साप्ताहिक) पेज सेटींग
वेब पोर्टल, युट्युब चॅनल
वृत्तपत्रांचे वार्षिक विवरण
नविन शिर्षक (वृत्तपत्र) नोंदणी ऑनलाईन अर्ज
वृत्तपत्रांशी निगडीत सर्व प्रश्नांचे अल्पदरात उपाय
वृत्तपत्र, वेब पोर्टल नोंदणी संदर्भात संपूर्ण मार्गदर्शन
अधिस्विकृती पत्रिकेसंदर्भात संपूर्ण मार्गदर्शन
वृत्तपत्र शासनमान्य यादीत समाविष्ट करण्यासाठी मार्गदर्शन
9975387225 8390098886

# संपादकीय

पान

## बंधने फक्त महिलांवरच?

आज २१ व्या शतकात पुरुष आणि महिला असा कोणताच भेद राहिला नाही. आज महिलाही पुरुषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहेत. असे कोणतेच क्षेत्र नाही जिथे महिला पुरुषांची बरोबरी करू शकत नाही. कला, क्रीडा, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, साहित्य अशा सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहे मात्र समाजात आजही असा एक घटक आहे ज्यांना महिलांची ही प्रगती खटकत आहे. आजही तो घटक महिलांना केवळ चूल आणि मूल या पुरतच मर्यादित ठेवू इच्छितो म्हणूनच हे सनातनी विचारांचे प्रतिगामी लोक महिलांना सतत या ना त्या कारणांहून ट्रोल करत असतात. कधी ते महिलांच्या केशभूषे वरून ट्रोल करतात तर कधी ते महिलांना त्यांच्या वेशभूषेवरुन ट्रोल करतात. आजच्या मुली मुलांप्रमाणे कपडे घालतात, जीन्स पॅन्ट टी शर्ट घालतात त्यांच्या जीन्स पॅन्ट गुडघ्यावर फाटलेल्या असतात याचा त्यांना राग येतो तर कधी मुलींच्या नटण्या मुरडण्याचा त्यांना राग येतो. महिलांना ट्रोल करण्यात समाजातील प्रतिष्ठित घटकही मागे नसतात. महिला गुडघ्यावर फाटलेली जीन्स घालतात हे कसले संस्कार असे ? असा प्रश्न मध्यंतरी उत्तरांचलच्या मुख्यमंत्र्यांनी जाहीर सभेत विचारला होता. केवळ हेच महाशय नाही तर अनेकजण महिलांच्या वेशभूषेवरुन महिलांना टार्गेट करत असतात वास्तविक कोणी कोणते कपडे वापरायचे हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. सार्वजनिक ठिकाणी गुडघ्यावर फाटलेली जीन्स पॅन्ट फक्त महिलाच घालतात का? पुरुषही फाटलेली जीन्स घालतात. बरमुडा किंवा शॉर्ट पॅन्ट घालून गावभर फिरतात पण त्यांच्या कपड्यावर कोणीच आक्षेप घेत नाही. म्हणजे पुरुषांनी कसलेही कपडे वापरले तरी चालेल मात्र महिलांना ते स्वातंत्र्य नाही. महिलांना मात्र त्यांच्या आवडीचे कपडे घालायला बंदी. मग प्रश्न येतो बंधने फक्त महिलांवरच का? महिलांनी कोणते कपडे घालावेत हे ठरवण्याचा अधिकार पुरुषांना कोणी दिला? महिलांनी कोणते व कसे कपडे घालावेत, महिलांनी कोठे फिरावे, काय खावे, काय प्यावे हे पुरुषांनी ठरवावे ही तर अठराव्या शतकातील मानसिकता झाली. २१ व्या शतकातही महिलांना समान अधिकार मिळत नाही त्यांना त्यांच्या अधिकारासाठी झगडावे लागते ही दुर्दैवाची बाब आहे. स्त्री पुरुष समानता ही फक्त बोलण्यापूरतीच आहे हेच या मानसिकतेतून दिसून येते. जगात एकीकडे महिलांना समान अधिकार मिळावेत यासाठी चळवळ उभी केली जात आहे तर आपल्याकडे महिलांनी कसे राहायचे, तिने कोणते कपडे घालायचे, कसे कपडे घालायचे यावर चर्चा केली जाते. प्रश्न महिलांनी कसे आणि कोणते कपडे घालायचा हा नसून प्रश्न त्यांच्या निवडीच्या स्वातंत्र्याचा आणि महिलांच्या मानवी हक्काचा आहे. हे हक्क कोणीही हिरावून घेऊ नये. महिला गुडघ्यावर फाटलेली जीन्स घालतात, तोकडे कपडे घालतात म्हणून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार होतात असा तर्क लढवला जातो. महिला संध्याकाळी बाहेर फिरायला जातात म्हणून त्यांच्यावर बलात्कार होतात असाही दावा तथाकथित संस्कृती रक्षक करतात पण ते सोयीस्करपणे हे विसरतात की आपल्या देशात अंगभर कपडे घातलेल्या साठ सत्तर वर्षाच्या वृद्धेवर देखील बलात्कार होतो. विकृत मानसिकता असलेले लोक अंगभर कपडे घातलेल्या महिलांकडे देखील विकृत नजरेने पाहतात. अंगभर कपडे असोत की तोकडे कपडे असोत ज्यांची मानसिकता विकृत आहे त्या नराधमांना महिला केवळ भोगवस्तू वाटते. महिलांच्या कपड्यांवर भाष्य करण्याऐवजी ही पुरुषी मानसिकता बदलली तर देशात महिला अत्याचाराच्या घटना घडणार नाही.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

### पान १ वरुन

## विना अनुदानित ...

असतील? आपला संसार कसा चालवित असतील याचा जराही विचार ना देशातील राज्यकर्ते करताहेत ना संस्थाचालक ना प्रशासन! यांना जराही लाज कशी वाटत नाही असा प्रश्न उपस्थित करून हाच का तो शिव फुले-शाहू-आंबेडकरांचा पुरोगामी महाराष्ट्र असा संतप्त सवाल विचारला आहे. दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी, सर्व विनाअनुदानित, अंशतः अनुदानित शाळांना शंभर टक्के अनुदान देऊन शिक्षकांची वेठबिगारी संपवावी अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव,सरचिटणीस राजकुमार कदम, कोषाध्यक्ष औताडे ए. बी., उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे, जालना जिल्हा अध्यक्ष रमेश आंधळे, सचिव संजय येळवंते, केंद्रीय कार्यकारणी सदस्य प्रेम दास राठोड, केंद्रीय कार्यकारणी सदस्य कुरेशी, जालना जिल्हा उपाध्यक्ष जगन वाघमोडे, जालना जिल्हा उपाध्यक्ष भीमाशंकर शिंदे, सय्यद, काकड, मांटे आदींनी केली आहे.

## पाटोद्याच्या...

मोती तलावास या सांस्कृतिक ठिकाणास भेट देऊन विविध खेळांचा आस्वाद घेतला. जालना शहरातील अतिशय महत्त्वाच्या जिल्हा स्काऊट व गाईड कार्यालय, जिल्हा क्रीडा प्रबोधिनी, तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, जालना शहर महानगरपालिका आदी प्रशासकीय ठिकाणी भेटी देऊन प्राथमिक शिक्षणाधिकारी कैलास दातखीळ व महानगरपालिकेचे मुख्य लेखाधिकारी तुकाराम भिसे यांच्याशी संवाद साधला. याशिवाय मंठा शहरालगत वीटभट्टी कारखान्यास भेट देऊन व्यावसायिक माहिती घेतली. जिल्हा क्रीडा प्रबोधिनी अंतर्गत विविध खेळ आणि योजनांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. प्राथमिक शिक्षणाधिकारी कैलास दातखिळ यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले तर महानगरपालिकेचे मुख्य लेखाधिकारी तुकाराम भिसे यांनी विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन प्रोत्साहित केले. उपशिक्षणाधिकारी विपुल भागवत, गटसमन्वयक के.जी. राठोड, केंद्रप्रमुख डी.ए.चव्हाण, मुख्याध्यापक संतोष तोटेवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक शिक्षक गंगाधर वानोळे यांनी पालकांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना विविध क्षेत्र भेटीचा प्रत्यक्ष अनुभव दिला.

## शेतकऱ्यांना ऊसाची ...

उस उत्पादक शेतकऱ्यांना एक रक्कमी एफ.आर.पी चा कायदा पूर्ववत व्हावा यासाठी मुंबई उच्च न्यायालयात सुरू असलेल्या याचिकेवर आज न्यायालयाने राज्यातील उस उत्पादक शेतकऱ्यांच्या बाजूने निकाल दिला.

# ‘शिवाजी विद्यापीठा’चा नामविस्तार ‘छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ’ झालाच पाहिजे!

### हिंदूंची मोर्चाद्वारे ललकारी




**कोल्हापूर । प्रतिनिधी -** येथील ‘शिवाजी विद्यापीठ’, चे ‘छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ’, असा नामविस्तार करण्यात यावा या मागणीसाठी हिंदु जनजागृती समिती आणि हिंदु राष्ट्र समन्वय समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, १७ मार्चला जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. १० सहस्रो हिंदूंनी एकमुखाने ‘छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ’ असा नामविस्तार झालाच पाहिजे, अशी मागणी केली. मोर्चाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. दसरा चौकातून चालू झालेला हा मोर्चा लक्ष्मीपुरी, व्हिनस कॉर्नर मार्गे ‘बी’ न्यूजच्या कार्यालयावरून जिल्हाधिकारी कार्यालय येथे समाप्त झाला. जिल्हाधिकारी कार्यालय येथे मोर्चा आल्यावर जिल्हा प्रशासनास निवेदन देण्यात आले. याच समवेत क्रूर औरंगजेबाच्या कबरीचे उदात्तीकरण तात्काळ थांबवण्यासाठी कबरीला दिला जाणारा निधी बंद करावा, तसेच औरंगजेबाची कबर काढून टाकण्यात यावी, या मागणीचेही निवेदन देण्यात आले.

या मोर्चात विविध आध्यात्मिक संप्रदाय, हिंदुत्वनिष्ठ संघटना, पक्ष, तरुण मंडळे, विविध सामाजिक संघटना, व्यापारी संघटना यांचा प्रमुख सहभाग होता. या मोर्चात सनातन संस्थेच्या धर्मप्रचारक सद्गुरु स्वाती खाडये यांच्यासह निपाणी येथील प.पू. प्राणलिंग स्वामिजी यांचा सहभाग होता.

मोर्चाच्या अंती तेलंगणा येथील प्रखर हिंदुत्वनिष्ठ आमदार टी.राजासिंह, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. रावसाहेब देसाईल, सनातन संस्थेचे श्री. अभय वर्तक, हिंदु राष्ट्र समन्वय समितीचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट, छत्रपती ग्रुपचे संस्थापक श्री. प्रमोददादा पाटील यांच्यासह छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सैन्यात सहभागी असलेल्या मावळांचे वंशज यांनी मनोगत व्यक्त केले. यात प्रामुख्याने वीर शिवा काशीद यांचे वंशज श्री. आनंदराव काशीद, सरदार मालुसरे यांचे वंशज कुनाल मालुसरे आणि सरसेनापती हंबीरराव मोहिते यांचे वंशज यांनीही मनोगत व्यक्त केले.

**नामविस्ताराला विरोध करणार्या पुरोगाम्यांना हिंदूंच्या संघटितपणाची शक्ती प्रत्युत्तर देईल ! - टी. राजासिंह, आमदार, तेलंगणा**

आज आपण इथे केवळ नामविस्ताराच्या मोर्चासाठी एकत्र आलेलो नसून हिंदूंची अस्मिता, गौरव आणि हिंदवी स्वराज्याचा संकल्प करण्यासाठी एकत्र आलो आहोत. छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ हे केवळ विद्यापीठ नसू तो आमचा स्वाभिमान आहे. इतकी वर्षे ‘छत्रपती’ ही पदवी लागू नये यांसाठी प्रयत्न करणे करणारे पुरोगामी आणि सेक्युलरवादी यांना जाहीर आव्हान देण्यासाठीच मी आलोय आणि हिंदूंच्या संघटितपणाची ही शक्ती इथे पाय रोवून उभी आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील विशाळगडावर आजही अनेक अतिक्रमण शिल्लक असून ही अतिक्रमणे शासनाने तात्काळ हटवली पाहिजेत, अन्यथा छत्रपती शिवाजी महाराजांच्या मावळ्यांनी ती हटवण्याची मोहीम हातात घ्यावी लागेल. एकीकडे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मंदिराला देण्यासाठी प्रशासनाकडे निधी नाही, तर दुसरीकडे तेच पुरातत्व खाते संभाजीनगर येथील औरंगजेबाच्या कबरीवर मात्र लाखो रुपये खर्च करत आहे. हे आम्ही सहन करणार नाही. तरी औरंजेबाच्या कबरीच्या देखभालीसाठी खर्च केला जाणारा निधी तात्काळ सरकारने बंद करावा, तसेच ही कबरही काढून टाकण्यात यावी.

**अर्थसंकल्पीय अधिवेशनापर्यंत नाव न पालटल्यास, तर संपूर्ण महाराष्ट्रात आंदोलन छेडणार ! - सुनील घनवट, हिंदु राष्ट्र समन्वय समिती**

शिवजयंतीच्या दिवशीच छत्रपती शिवाजी महाराज अशी उपाधी देण्याची मागणी करावी लागते हे दुर्दैवी आहे. हा विरोध केवळ ‘छत्रपती’ या शब्दाला नसून ‘छत्रपती शिवाजी महाराजांना’च आहे. नेहरूंना जर ‘पंडित’ ही उपाधी चालते, गांधीजींना ‘महात्मा’ ही उपाधी चालते, तर शिवाजी महाराज यांचा ‘छत्रपती’ ही पदवी का चालत नाही. पुरोगाम्यांना ‘छत्रपती म्हणण्यास लाज का वाटते ?’, फेब्रुवारी २०११ मध्ये काढलेल्या महाराष्ट्र शासनाच्या आदेशात म्हटले आहे की, राष्ट्रपुरुष आणि क्रांतीकारक यांचा अवमान होता कामा नये हे पुरोगामी स्वतःला शिवप्रेमी समजतात; मात्र हे तथाकथित शिवप्रेमी आहेत. त्यांचा ‘सिलेक्टेड’ शिवप्रेम आहे, कारण हे लोक औरंगजेबाच्या थडग्याचे (कबरीचे) समर्थन करणारे, तसेच औरंगजेबाचे स्टेटस ठेवणारे यांच्याविषयी चकार शब्द उच्चारत नाहीत. महाराष्ट्रात ‘छत्रपती शाहू महाराज, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर विद्यापीठ, राजश्री छत्रपती शाहू महाराज कृषी महाविद्यालय अशी पूर्ण नावे दिले, तर ते चालते; मात्र शिवाजी विद्यापिठाचे नाव पालटून ते छत्रपती शिवाजी महाराज असे करा म्हटले की, आडकाठीची भूमिका घेतली जाते. आज जवाहरलाला नेहरु युनिर्वसिटी (‘जे.एन.यु.’मध्ये) केवळ ‘भारत तेरे टुकडे होंगे’च्या घोषणा दिल्या जात नसून, स्वामी विवेकानंद यांच्या मूर्तीची विटंबना करण्यात आली, दंतेवाडा येथे नक्षलवाद्यांनी भारतीय सैनिकांची हत्या केल्यावर विद्यापिठात मिठाई वाटण्यात आली. तोच प्रकार आपल्याला कोल्हापूर येथे होऊ द्यायचा नसून कोणत्याही परिस्थितीत शिवाजी विद्यापीठाला ‘जे.एन.यु.’ होऊ देणार नाही. कोल्हापूर हे कधीही सहन करणार नाही. अर्थसंकल्पीय अधिवेशन संपेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ असे नाव यात विद्यापिठाला दिले पाहिजे. अन्यथा राज्यभर या विषयी आंदोलन छेडून लढा चालूच ठेवण्यात येईल.

छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदराने उल्लेख करण्याऐवजी ‘शिवाजी कोण होता ?’, असे पुस्तक लिहिणारे कॉ. पानसरे कोण आहेत ? अशा प्रकारे शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख हा हिंदूंच्या अस्मितेवर आघात असून या पुस्तकावर शासनाने बंदीच घालणे अपेक्षित आहे. २६/११ चे आक्रमण आतंकवादी कसाबने केले हे सर्वोच्च न्यायालयानेही मान्य केलेले असतांना भारतीय गुप्तचर यंत्रणांवर संशय घेणारे जे ‘हू किल्ड करकरे’, असे पुस्तक ज्यांनी लिहिले, त्यांचे समर्थन करणार्यां पुरोगाम्यांचा चेहरा या निमित्ताने आता उघड होत आहे.

**जोपर्यंत विद्यार्थ्यांमध्ये छत्रपती शिवरायांचा खरा विचार रूजत नाही, तोपर्यंत हा लढा चालूच राहिल ! - अभय वर्तक, सनातन संस्था**

जे लोक छत्रपती शिवाजी महाराज यांचा नेहमी ऐकेरी उल्लेख करतात त्या विचारधारेतील लोकांकडूच आज विद्यापीठाचा विस्तार ‘छत्रपती’ होताना सहन होत नाही. या नामविस्तारला मुख्यत्वेकरून पुरोगामी, डावे आणि हिंदूविरोधी यांचाच विरोध असून ‘लघुरूप’ची खोटी कथानके रचली जात आहेत. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज यांनी ‘सेक्युलर’बनवण्याचे षडयंत्र आम्ही यशस्वी होऊ देणार नाही. छत्रपतींचे राज्य हे ‘हिंदवी स्वराज्य’ म्हणून ओळखले जाते त्या छत्रपतींच्या विद्यापीठातील मूर्तीसमोर भगवा ध्वज नसावा ही किती दुर्दैवी आहे. त्यामुळे यापुढील आपला लढा केवळ नामविस्तारापुरता मर्यादित नसून जोपर्यंत विद्यार्थ्यांमध्ये छत्रपती शिवरायांचा खरा विचार रूजत नाही, तोपर्यंत हा लढा चालूच राहिल !

‘श्री’ संप्रदाय, वारकरी संप्रदाय, स्वामी समर्थ संप्रदाय, इस्कॉन, मंदिर सेवेकरी, गजानन महाराज भक्त मंडळ, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, हिंदू एकता आंदोलन, हिंदू महासभा, ‘छत्रपती ग्रुप’, महाराष्ट्र मंदिर महासंघ, ‘महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स’, ‘अखिल भारतीय रेशनिंग महासंघ’, सनातन संस्था, हिंदु जनजागृती समिती, शिवसेना, भाजप, उद्धव बाळासाहेब ठाकरे गट, विविध तरुण मंडळे, तालीम आदी संघटना आणि संप्रदाय मोर्चात सहभागी झाले होते.

# शेतकरी आत्महत्या समजावून घेताना

**अमर हबीब**

शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही राष्ट्रीय आपत्ती आहे. ती नीटपणे समजावून घेतली तरच त्यावरचे नेमके उपाय काढता येतील. रोजच्या होणाऱ्या आत्महत्यांकडे डोळेझाक न करता डोळसपणे पाहिले पाहिजे, यासाठी किसानपुत्र आंदोलनाचे अमर हबीब यांनी केलेली ही मीमांसा पहा!

**शेतकरी आत्महत्यांचे वेगळेपण काय?**

अन्य कोणत्याही एका व्यवसायातील लोकांनी एवढ्या मोठ्या प्रमाणात आत्महत्या केलेल्या नाहीत. एकाच व्यवसायतील सर्वात जास्त आत्महत्या फक्त शेतकऱ्यांच्या आढळुन येतात.

या आत्महत्या करणारे शेतकरी एकाच पिकाचे उत्पादक नाहीत. एकाच प्रदेशातील किंवा एकाच राज्यातील नाहीत. एकाच जातीचे किंवा एकाच धर्माचे नाहीत. शेतकरी आत्महत्या मध्ये वयोगटाचे सारखेपण नाही. शेकडो महिला शेतकऱ्यांनी देखील आत्महत्या केल्या आहेत.

जगभर शेतकरी आत्महत्या घडल्या असल्या तरी सर्वाधिक आत्महत्या भारतात झाल्या आहेत. भारतात सर्वाधिक आत्महत्या महाराष्ट्रात होत आहेत.

**कोणते शेतकरी आत्महत्या करतात?**

ज्यांचे होल्डिंग अत्यंत कमी असते.

ज्यांच्या कुटुंबात शेतीबाह्य उत्पन्न येत नाही.

असे शेतकरी सर्वाधिक आत्महत्या करतात.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्या का होतात?**

बाकीची बकवास कारणे आपण बाजूला ठेवली तरी तीन कारणे हमखास सांगितली जातात.

भाव मिळत नाही., कर्जबाजारीपणा., भागत नाही..... भाव का मिळत नाही? कारण सरकार भाव मिळू देत नाही. सरकार कसे भाव मिळू देत नाही? भाव मिळू नये म्हणून आवश्यक वस्तू कायद्याने दिलेल्या अधिकाराचा वापर करून सरकार भाव नियंत्रण करू शकते. मार्केट कमिटीचा कायदा, आयात निर्यात संबंधीचे कायदे, प्रक्रिया उद्योगाबद्दलचे कायदे, भांडारण, अन्नसुरक्षा, ही सगळी आवश्यक वस्तू कायद्याची अपत्ये आहेत. हा कायदा कायम ठेवून तुम्हाला भाव कसा मिळेल?

कर्जबाजारीपणा हे कारण चालाखीचे आहे. आतापर्यंत चार वेळा कर्जमाफी झाली. तरी पुन्हा शेतकरी कर्जबाजारी. मग या माफीचा लाभ कोणाला मिळतो? हा लाभ सातबारा असणारे बिगर शेतकरी जास्त घेतात. त्यांची कर्जमाफी व्हावी यासाठी ते 'सरसकट' माफी करा असे म्हणत राहतात. ज्यांचे मुख्य उत्पन्नाचे साधन फक्त शेती आहे, त्यांच्यावर किती कर्ज असते? ते खुपणकमी असते. किरकोळ कर्ज वर्षातून दोनदा देखील माफ करता येईल. जे एरवी इन्कम टॅक्स भारतात, ज्यांच्याकडे काळा पैसा येतो, त्यांना शेतीतील उत्पन्न दाखवून आपला काळा पैसा पांढरा करून घ्यायचा असतो, त्यांच्याकडे मोठं मोठे कर्ज असतात. कर्ज माफी त्यांना हवी असते. जे आत्महत्या करत नाहीत.

ज्यांचे मुख्य उत्पन्नाचे साधन फक्त शेती आहे अशा शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली पाहिजे, यात वाद नाही.

शेतकरी कर्ज फेडू शकत नाही म्हणून कर्जबाजारी होतो, एकदा थकबाकीदार झाला तर बँकेचे दार बंद होते, अशा वेळेस सावकाराशिवाय पर्याय नसतो. शेतकरी कर्ज का फेडू शकत नाही? कारण त्याच्या मालाला वाजवी भाव मिळत नाही. वाजवी भाव का मिळत नाही? कारण आवश्यक वस्तू कायदा. हा क्रम समजावून घेतला तरी लक्षात येईल की कर्जबाजारी होणे हा आवश्यक वस्तू कायद्याचा भीषण दुष्परिणाम आहे.

तिसरे कारण सांगितले जाते की शेतकऱ्याचे भागत नाही. का भागत नाही? कारण होल्डिंग लहान झाले, भावही मिळत नाही. होल्डिंग का लहान झाले? त्याचे मुख्य कारण कमाल शेतजमीन धारणा कायदा अर्थात सीलिंगचा कायदा.

**सीलिंग कायद्याचा शेतकरी आत्महत्यांशी कसा संबंध आहे?**

सीलिंग म्हणजे अधिकची मर्यादा. या पेक्षा जास्त नाही म्हणजे सीलिंग.

सीलिंग कायद्याचे पूर्ण नाव कमाल शेतजमीन धारणा कायदा आहे. इंग्रजीत एग्रीकल्चरल लँड सीलिंग ॲक्ट असे आहे. याचा अर्थ असा की हा कायदा फक्त शेतजमिनीवर लागू आहे. कारखानदारी किंवा इतर कोणत्याही जमिनीवर लागू नाही. शेतजमीवर सीलिंग म्हणजेच शेतकऱ्यांवर टाकलेले हे बंधन आहे. असे बंधन इतरांवर नाही. या कायद्याने पक्षपात केला आहे. शेतकऱ्यांवर बंधन टाकून एका परिस्थितीत लोटले आहे. या परिस्थितीची अंतिम परिणीती शेतकऱ्यांच्या आत्महत्या आहेत.

कोरडवाहू ५४ एकर बागायती काही ठिकाणी ३६, काही ठिकाणी १८ तर काही ठिकाणी ८ एकर अशी मर्यादा टाकली आहे. परिणाम काय झाला ५४ एकरवाल्या शेतकऱ्याला चार मुले झाली. ते १३-१३ एकर आले. पुढच्या पिढीत दोन मुले झाली ते ६.५ एकरवर आले. तिसऱ्या पिढीत ते अल्पभूधारक झाले. जमीनेचे तुकडे होत गेले. आज भारताचे सरासरी होल्डिंग २ एकरवर आले आहे.

भारतात जमिनीचे विखंडन मोठ्या प्रमाणात होण्याचे महत्वाचे कारण सीलिंग कायदा आहे. ज्या देशात सीलिंग कायदा नाही, त्या देशात जमिनीचे विखंडन होताना दिसत नाही.

जमिनीच्या विखंडनामुळे अन-इकॉनॉमिक (आर्थिक दृष्ट्या अयोग्य) होल्डिंग (धारणा) निर्माण झाली. त्यातून शेतकऱ्यांच्या आत्महत्या होऊ लागल्या.

वर सांगितल्या प्रमाणे शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या अत्यल्प भूधारक आणि शेतीवाहय उत्पन्न नसणाऱ्या कुटुंबात होतात.

सीलिंगच्या कायद्याचा आणखी एक मोठा फटका बसला. भारतात शेती करणाऱ्या कंपन्या तयार झाल्या नाहीत. सगळ्या विकसित देशात शेतकऱ्यांच्या कंपन्या आहेत. कारण तेथे सीलिंग सारखा कायदा नाही. शेतकऱ्यांच्या कंपन्या झाल्या असत्या तरी शेतकऱ्यांच्या आत्महत्या टाळल्या असत्या.

**आजच्या काळात शेतीचे चित्र काय दिसते?**

शेतकऱ्यांनी आपली मुले शेतीच्या बाहेर काढण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी खूप हाल अपेष्टा सहन केल्या. मुले/मुली बाहेर पडली. सगळेच जण खुशाल आहेत असे म्हणता येत नाही पण त्यांचे दुःख बदलले गेले हे मात्र नक्की.

या स्थलांतर किंवा स्थित्यंतरामुळे अनेक कुटुंबात शेतीबाह्य पैसा येऊ लागला. ज्यांच्या घरात शेतीबाह्य पैसा आला, त्या कुटुंबातील आत्महत्या टळली. पण आजही अशी १० ते १५ टक्के कुटुंबे अशी आहेत की ज्यांच्या कुटुंबात शेतीबाह्य पैसा येत नाही. ही कुटुंबे आत्महत्येच्या सावटाखाली आहेत.

जेंव्हा ५०-६० टक्के कुटुंबे केवळ शेतीच्या उत्पन्नावर अवलंबून होती, तेंव्हा महाराष्ट्रात ७-८ शेतकरी रोज आत्महत्या करायचे. आज १० ते १५ टक्के कुटुंबेच केवळ शेतीच्या उत्पन्नावर अवलंबून आहेत तरीही दररोज ७ ते ८ आत्महत्या रोज होत आहेत. याचा रथ असा की १० ते १५ टक्के शेतकरी कुटुंबावरचे संकट अधिक गडद झाले आहे.

**आत्महत्या रोखण्यासाठी काय करायला हवे?**

आत्महत्या रोखण्याचा कायमस्वरूपी उपाय शेतकरीविरोधी सीलिंग, आवश्यक वस्तू, जमीन अधिग्रहण हे कायदे रद्द करणे हा आहे.

हंगामी स्वरूपात तातडीने पुढील उपाययोजना करता येतील.

ज्या कुटुंबात शेतीबाह्य उत्पन्न येऊ लागले, त्या कुटुंबातील आत्महत्या टळल्या आहेत, राहिलेल्या १० ते १५ टक्के शेतकऱ्यांच्या कुटुंबात शेतीबाह्य उत्पन्न कसे येईल, याचा तातडीने विचार केला पाहिजे.

सरकारी वेतन आयोगाच्या शिफारशी नुसार चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांसाठी १८ हजार रुपये महिना ठरवले आहे. तसे १८ हजार रुपये महिन्याला या कुटुंबांना पोचविण्याची तरतूद सरकारने करावी. यासाठी हवे तर इतर अनुदाने बंद करावी. अशी तरतूद हंगामी असणार आहे.

संपूर्ण महाराष्ट्र हादरवून टाकणाऱ्या साहेबराव करपे कुटुंबाची सामूहिक आत्महत्या १९ मार्च १९८६ रोजी झाली होती. या काळात लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. परंतु लोकसभा व विधानसभेत आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करणारा साधा ठराव देखील झाला नाही. राज्यकर्ते शेतकऱ्यांच्या प्रती संवेदनाशून्य झाले आहेत.

१९ मार्च हा 'शेतकारी सहवेदना दिवस' आहे, या दिवशी लोकसभा-विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलवावे. आत्महत्या केलेल्या तमाम शेतकऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करून शेतकरी आत्महत्या होणार नाहीत, यासाठी उपाययोजना निश्चित करावी, अशी माझी सूचना आहे.

लोकसभा-विधानसभा दखल घेईल की नाही, हे आज सांगता येत नाही, तरी आज गावो गावच्या ग्रामपंचायती, ग्रामसभांनी 'आत्महत्या केलेल्या तमाम शेतकऱ्यांना' श्रद्धाजली अर्पण करणारा ठराव करून महाराष्ट्र विधानसभेच्या सभापतींना पाठवावा, हे सहज शक्य आहे.

किसानपुत्रांची जबाबदारी मोठी आहे. एकेकाळी दलित पँथरने दलित समाजासाठी जसा आवाज उठवला होता, तसा आवाज किसानपुत्रांनी शेतकरी समाजासाठी उठवायला हवा.

**अमर हबीब, किसानपुत्र आंदोलन आंबाजोगाई. मो ८४११९०९९०९**

# अपघात व जप्त गाड्या सांभाळायच्या कधीपर्यंत?

## आरसी बुक घेऊन या अन् अपघातातील गाडी घेऊन जाण्याचे टेंभुर्णी पोलिसांचे आवाहन

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** अपघात आणि गुन्ह्यातील अनेक दुचाकी या पोलिस स्टेशनला जमा असतात. यातील प्रकरणे न्यायप्रविष्ठ असल्याने वर्षानुवर्षे या गाड्या पोलिस स्टेशनला तशाच पडून भंगार होतात. टेंभुर्णी पोलिस ठाण्यामध्ये अशा प्रकारच्या अनेक वर्षांपासून पडलेल्या ४० गाड्या भंगार झाल्या आहेत. अखेर या भंगार गाड्या सांभाळायच्या तरी कुठपर्यंत म्हणून पोलिसांनी आता या गाड्या संबंधित गाडी मालक किंवा नातेवाईकांकडे सुपूर्द करणे सुरू केले आहे. टेंभुर्णी पोलिसांनी केलेल्या या आव्हानाला प्रतिसाद देत आतापर्यंत पाच जणांनी अपघातातील आपल्या गाड्या सोडवून नेल्याचे सहायक पोलिस निरिक्षक सचिन खामगळ यांनी सांगितले.



अपघात आणि गुन्ह्यातील या गाड्या सांभाळणे पोलिसांसाठी एक आव्हान बनले आहे. या गाड्यांसाठी भरपूर जागा लागत असल्याने त्या वर्षानुवर्षे सांभाळणे कठीण बनून जाते. या गाड्या अनेक वर्षापासून एकाच जागेवर आहेत. त्यामुळे त्यांना गंज चढला आहे.

टेंभुर्णी पोलिस ठाण्यात पडलेल्या गाड्या अशा भंगार झाल्या आहेत. दुसऱ्या छायाचित्रात अपघातातील गाड्यांचे रविवारी रेकॉर्ड तपासून त्या नातेवाईकांच्या सुपूर्द करताना एपीआय सचिन खामगळ व पोलिस कर्मचारी.

सध्या महाराष्ट्र शासनातर्फे १०० दिवसांचा कृती कार्यक्रम राबविला जात आहे. त्यामुळे टेंभुर्णी पोलिस ठाण्यातील या भंगार अवस्थेत पडलेल्या गाड्या मूळ मालक किंवा त्यांच्या नातेवाईकांना घेऊन जाण्याचे आवाहन करण्यात आले.

सध्या महाराष्ट्र शासनातर्फे शासनाचा शंभर दिवसांचा कृती कार्यक्रम राबविला जात आहे. यात प्रत्येक पोलिस स्टेशनची रंगरंगोटी, साफसफाई व आंतरबाह्य स्वच्छता केली जात आहे. अशावेळी भंगार पडलेल्या या गाड्या अडचणीच्या ठरत आहे. त्यामुळे ज्या गाड्या परत देणे शक्य आहे, अशांची योग्य विल्हेवाट पोलिसांमार्फत लावली जात आहे. टेंभुर्णी पोलिस स्टेशनला मागील कित्येक वर्षांपासून जवळपास ४० गाड्या भंगार अवस्थेत पडून आहे. ज्या गाड्या ठाण्यात पडून आहे, त्या आरसी बुक पाहून खात्री पटल्यानंतर संबंधित मालक किंवा नातेवाईकांना परत करत आहे. वेगवेगळ्या गुन्ह्यातील ज्या गाड्या जप्त केल्या. त्यांनीही कोर्टाचा आदेश आणला तर त्या गाड्याही परत केल्या जातील. आतापर्यंत ५ गाड्या परत केल्याची माहिती टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे सपोनि सचिन खामगळ यांनी दिली.

## पान १ वरुन

### प्रभारी कारभारामुळे ...

असून केवळ एकूण जमिनीच्या दोन टक्के क्षेत्रावर झाड उपलब्ध आहेत या उलट चंद्रपूरमध्ये मात्र ६३ टक्के पेक्षा अधिक जमीन क्षेत्रावर झाड उपलब्ध आहेत हा फरक महाराष्ट्र सरकारने लक्षात घेणे आवश्यक आहे पाऊस पडणारे किंवा अधिकाधिक ऑक्सिजन देणारी ५१ प्रकारच्या जातीचे झाड लावणे आवश्यक असून झाडांची होणारी कत्तल थांबवण्यासाठी वनविभाग व सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने ठोस भूमिका घेणे आवश्यक आहे असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले. ग्रामीण भागामध्ये शेतकऱ्यांना वन्य प्राण्यांचा प्रचंड त्रास असून शेतीचे खूप मोठे नुकसान वन्यप्राण्यांच्या माध्यमातून होत आहे परतुर विधानसभा मतदारसंघांमध्ये पाझर तलाव लघु तलाव व निम्न दुधना प्रकल्प यासह उपलब्ध असलेल्या पाणीसाठ्यामुळे २००-२०० पेक्षा अधिक हरणांचे कळप शेतकऱ्यांचे पीक उध्वस्त करत आहेत हरणांबरोबरच रानडुक्कर काळवीट यांचे देखील खूप मोठ्या प्रमाणात कलप शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान करत आहेत परिणामी शेतकरी प्रचंड अडचणीत सापडले असून वन विभागाच्या अधिकाऱ्यांना विचारले असता त्यांच्याकडे या सर्व वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करण्यासाठी लागणारी यंत्रणा उपलब्ध नसल्याची माहिती अधिकारी देतात. त्याचप्रमाणे ज्या शेतकऱ्यांनी मागणी केली असेल त्यांना वन्यप्राण्यांपासून संरक्षण मिळावे यासाठी थेट स्वरूपात किंवा रोजगार हमी योजनेच्या स्वरूपात शेतासाठी कुंपण उपलब्ध करून देण्याची व्यवस्था महाराष्ट्र शासनाने करावी अशी मागणी देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी विधानसभेत केली. २०१४ साली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात स्थापन झालेल्या सरकारच्या वतीने जागतिक बँकेचे कर्ज काढून नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना सुरू करण्यात आले होते या योजनेमध्ये सुरुवातीला मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांसाठीच्या योजना होत्या त्या योजना आता कमी करण्यात आल्या असून पहिल्यांदा योजना सुरू झाली त्यावेळेला शेतकऱ्यांना जोडधंदा उपलब्ध करून देण्याचा उद्देश या योजनेमध्ये होता तो आता कमी करण्यात आला असून पुन्हा एकदा नव्याने नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना टप्पा २ सुरू झाल्यामुळे या योजनेत पुन्हा एकदा शेतीसाठी जोडधंदा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्र हा शेती आणि शेतकऱ्यांशी निगडित असणारा प्रदेश आहे मराठवाडा आणि विदर्भातील शेतकरी मोठ्या प्रमाणात इतरांच्या तुलनेत मागासलेला आहे परिणामी शेती सोबतच दुग्ध व्यवसाय शेतकऱ्यांनी उभारल्याचे चित्र अनेक ठिकाणी आपल्याला दिसून येते परंतु जालना जिल्ह्यामध्ये आणि संपूर्ण मराठवाड्यामध्ये दुग्ध व्यवसायासाठी आवश्यक असणारे शीतगृह कुठेही उपलब्ध नाही परिणामी शेतकऱ्यांना त्यांचे दूध मातीमोल किमतीने विकावे लागत आहे त्यामुळे महाराष्ट्र सरकारच्या वतीने प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी एक शीतगृह (चिलिंग प्लांट) सुरू करण्यात यावा व शेतकऱ्यांनी अधिकाधिक मोठ्या प्रमाणात दुग्ध व्यवसाय सुरू करण्यासाठी शासकीय पातळीवर मदत करण्यात यावी अशी मागणी देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी आज विधानसभेत केली ग्रामीण भागामध्ये शाळा खोल्यांची प्रचंड दुरावस्था झालेली असून शाळा खोल्यांबरोबरच मुला-मुलींसाठी आवश्यक असणारे स्वच्छतागृह याची मोठ्या प्रमाणात दयनीय अवस्था झालेली आहे. शिक्षण विभागाच्या वतीने सन्माननीय शिक्षण मंत्री यांना विनंती करत आमदार बबनराव लोणीकर यांनी मराठवाड्यासह महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये चांगल्या शाळा खोल्या व त्याचबरोबर चांगले स्वच्छतागृह उपलब्ध करून देण्यासंदर्भात विनंती केली. सकाळपासून शाळेमध्ये आलेल्या मुलींची प्रचंड मोठी अडचण निर्माण होत असून स्वच्छतागृह उपलब्ध नसल्यामुळे दिवसभर मुलींना त्रास सहन करावा लागतो आहे परिणामी शासनाने अत्यंत गांभीर्याने या सर्व बाबींची दखल घेत लवकरात लवकर या संदर्भाने निर्णय घ्यावा अशी मागणी देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी केली.

# वाळू तस्करीला आळा घालण्यासाठी सर्वंकष वाळू धोरण - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई -** वाळू तस्करीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सध्या राज्यात महसूल आणि पोलीस दलाकडून संयुक्त कारवाई करण्यात येते. परंतु राज्यात वाळू माफिया आणि वाळू तस्करीच्या घटना वाढतच आहेत. यासाठीच राज्य शासन सर्वंकष वाळू धोरण तयार करणार आहे, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानपरिषदेमध्ये दिली.

विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री बावनकुळे बोलत होते. यावेळी सदस्य प्रविण दरेकर, शशिकांत शिंदे, एकनाथ खडसे यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला.

राज्यात वाळू माफियांना आणि वाळू तस्करांना संरक्षण मिळणार नाही अशी ग्वाही देऊन मंत्री बावनकुळे म्हणाले की, गोदावरी खोऱ्यातील वाळू उपसाबाबत ७ दिवसात चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल. राज्य शासन नव्या वाळू धोरणाबाबत काम करत असून यानुसार आता एम सॅन्ड म्हणजेच दगडापासून तयार केलेल्या वाळूच्या वापरावर भर देण्यात येणार आहे. यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात वाळू क्रशर उभारण्यात येणार आहे. त्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात किमान ५० ते १०० अशा प्रकारचे क्रशर उभारण्याचे नियोजन आहे. यामुळे वाळूची उपलब्धता वाढून सध्या वाळू पुरवठा आणि मागणीमध्ये असलेली तफावत दूर होणार आहे. त्यामुळे वाळू माफियांवर आपोआप नियंत्रण येईल. तसेच वाळू तस्करीबाबत महसूल व पोलीस अधिकारी यांना कारवाईचे समान अधिकार देण्याचाही वाळू धोरणामध्ये समावेश असणार आहे. वाळू धोरण तयार करताना लोकांच्या सूचनांचाही त्यामध्ये अंतर्भाव करण्यात आला आहे. त्याशिवाय रत्नागिरी, रायगड जिल्ह्यामध्ये सुरू असलेल्या सक्शनपंपाच्या सहाय्याने वाळू उपशाची चौकशी करून कारवाई करण्यात येईल, असेही मंत्री बावनकुळे यांनी सभागृहात सांगितले.

तसेच सदस्य शशिकांत शिंदे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री बावनकुळे म्हणाले की, सातारा जिल्ह्यातील खटाव येथील प्रकरणी विभागीय आयुक्तांमार्फत ७ दिवसात चौकशी करुन चौकशीमध्ये दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल.

# राज्यात आतापासूनच उन्हाचे चटके आणि पाणी टंचाई... पुढे काय!

राज्यासह देशातील वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण, वाढते वाहतूकीचे प्रमाण, सिमेंटीकरण,मोठ्या प्रमाणात जंगलतोड यामुळे हवामानात दिवसेंदिवस आमुलाग्र बदल होत आहे.या बदलत्या हवामानामुळे निर्माण झालेली गंभीर परिस्थिती दिवसेंदिवस आक्राळ-विक्राळ रूप धारण करीत आहे.यामुळे मानव, पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतू यांच्यापुढे अत्यंत गंभीर व चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. बदलत्या हवामानामुळे राज्यासह देशातील अनेक भागांत आतापासूनच उष्णतेची लाट पहायला मिळत आहे.ही राज्यासाठी व देशासाठी धोक्याचीच घंटा म्हणावी लागेल. यावरून स्पष्ट होते पुढील दिवस अत्यंत गंभीर रूप धारण करू शकतात.कारण आताच नागपूरचा पारा ४१.१ डिग्री सेल्सियसवर येवून पोहोचला आहे तर दुसरीकडे १३ मार्चला ब्रम्हपुरी येथे राज्यातील तसेच देशातील सर्वाधिक पारा ४२ अंश डिग्री सेल्सियस इतक्या तापमानाची नोंद करण्यात आली.म्हणजेच आतापासून उष्णतामान वाढने पुढील दिवसांसाठी कठीणाई निर्माण करू शकते यालाही नाकारता येत नाही. त्यामुळे बदलते हवामान व वाढते उष्णतामान पहाता सर्वांनीच सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे.हवामान खात्याने हेही सांगितले आहे की पुढे चालून तापमानात कमी होण्याची संभावना नसल्याने स्पष्ट सांगितले आहे.कारण १३ व १४ मार्चला विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांना हीट वे ची चेतावणी देण्यात आलेली होती.म्हणजेच उष्णतेच्या बाबतीत पुढील काळ अत्यंत गंभीर असल्याचे दिसून येते.कारण होळीपुर्वीच गुजरात, महाराष्ट्र आणि राजस्थानमधील अनेक भाग उष्णतेच्या लाटेच्या तडाख्यात आहेत. गुजरात- राजस्थान- महाराष्ट्रातील डझनभराहुन अधिक शहरांमध्ये तापमानाने ४० अंशाचा टप्पा ओलांडला आहे. यावरून आपण समजू शकतो की पुढील काळ अत्यंत कठीण व बिकट परिस्थिती निर्माण करू शकते याला नाकारता येत नाही. सध्याच्या परिस्थितीत उष्णता वाढल्याने युवा वर्ग नदी, तलाव याठिकाणी मौजमस्ती करण्यासाठी जातात व ज्यांना पोहता येत नाही अशे युवक-युवती नदी किंवा तलावात उतरण्याचा प्रयत्न करतात अशावेळी मोठी दुर्घटना होऊ शकते आणि होत आहे यामुळे परिवारावर व संपूर्ण कुटुंबावर मोठा कठीण प्रसंग निर्माण होतो.त्यामुळे युवकांनी नदी-तलाव यापासून सावधगिरी बाळगुन दुर रहावे कारण कोणतीही दुर्घटना सांगुन येत नाही ती केव्हाही कधीही होऊ शकते.त्यामुळे अशा दुर्घटनांपासुन वेळीच स्वतःला सावरले पाहिजे. तापमान वाढल्याने आगीच्याही घटनांमध्ये सुध्दा वाढ झाल्याचे दिसून येते. आतापासुन निर्माण झालेले वाढते उष्णतामान हळूहळू पाण्याच्या समस्येकडे वाटचाल करीत आहे आणि याचा फटका थोड्याच दिवसात आपनासर्वांना भोगावा लागु शकतो यालाही नाकारता येत नाही.वाढत्या उष्णतामानामुळे त्वचेचा आजार किंवा अन्य आजाराचा धोका निर्माण होऊ शकतो. याकरीता आतापासूनच वाढते उष्णतामान पहाता स्वतःची काळजी स्वतःच घेतली पाहिजे.घराच्या बाहेर निघतांना कानाला व डोक्याला दुपट्टा बांधुनच निघावे,पाणी जास्तीत जास्त प्यावे व उष्णतेपासून स्वतःचा जेवढा बचाव करता येईल तेवढा बचाव अवश्य केला पाहिजे.कारण बदलत्या हवामानामुळे यावर्षी उष्णतेचे प्रमाण जास्त रहाण्याची शक्यता हवामान खात्याकडुन वर्तवली जात आहे आणि त्याची सुरुवात वेळेच्या आधी झाल्याने मानव, पशुपक्षी व अन्य जीवजंतू यांना आतापासूनच त्याची झळ सोसावी लागत आहे.त्यामुळे सावधान वाढत्या उष्णतेपासून स्वतःही सुरक्षित रहा व पशुपक्षांनाही सुरक्षित ठेवा.मार्च महिन्याच्या मध्यातच उन्हाच्या झळा तीव्र होत असल्याने पाण्याच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे.राज्यात दमदार पाऊसामुळे नद्या, तलाव,धरणात आक्टोंबर महिन्यात मुबलक पाणी साठा जमा झाले होते म्हणजेच ८८ टक्के जलसाठा होता.ही मागील पाच वर्षातील मोठी वाढ मानली जात होती.परंतु वाढते उष्णतामान पहाता जलसाठा दिवसेंदिवस कमी कमी होत आहे ही चिंताजनक बाब आहे.मागील पाच महिन्यांत राज्यातील जलसाठ्यात ३५ टक्क्यांनी घट होऊन ५२.७१ टक्यावर आला आहे.सध्याच्या परिस्थितीत जलसाठा कोकण ५७.६३ टक्के, मराठवाडा ५१.११ टक्के, नागपूर ४८.८३ टक्के, अमरावती ५७.३९ टक्के, नाशिक ५२.८९ टक्के, पुणे ५२.२२ टक्के इतका जलसाठा राज्यातील मुख्य धरणांमध्ये शिल्लक आहे.पाण्याची कठीण परिस्थिती पाहता राज्यातील कोकण व पुण्यातील दहा गावांना व ९५ वाड्यांना टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे यावरून आपण समजू शकतो की पुढील काळ अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण करू शकते.त्यामुळे पाण्याच्या बाबतीत सावधगिरी बाळगणे अत्यंत गरजेचे आहे.दरम्यान आगामी काळातील वाढते उष्णतामान, पाण्याची मागणी, बाष्पीभवनाचा वेग बघता पाणी टंचाई अत्यंत गडद होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.याकरीता सरकारने ताबडतोब नियोजन करण्याची गरज आहे.त्याचप्रमाणे वाढते उष्णतामान पहाता सर्वांनीच सावधगिरी बाळगुन आरोग्याची काळजी घ्यावी.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# पहीला रोजा



**जाफराबाद** - तालुकयातील सावंगी येथिल रहिवासी अहमद पठान याची मुलगी जैनब पठान वय सात वर्ष या चिमुकलिन पवित्र रमजान महीनयात रख रख त्या उन्हत आपल्या जीव नातिल पही ला रोजा पूर्ण केला बद्दल त्याचे वाडिल अहमद पठान प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्रचे पत्रकार संघटनेचे जाफराबाद तालुका अध्यक्ष अशफाक शेख, सूफियान पठान, रेहान पठान, यूसुफ पठान, यूसुफ सौदागर, अरहान पठान आदींनी कौतुक केले.

**छत्रपती संभाजीनगर -** हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष व शिक्षक शेख अब्दुल रहीम यांची मुलगी जैनब शेख हिने आपल्या जीवनातील पहिला रमजानचा रोजा (उपवास) वयाच्या ७व्या वर्षी पूर्ण केला आहे. शांतीचा संदेश देणारा रमजान महिन्यात जैनब हिने पहिला उपवास पूर्ण केल्याने नागरिकांतुन तसेच शेख आणि खान कुटुंबातुन तिचे कौतुक केले जात आहे. माजी नगरसेवक काम्रेड शेख बाबू यांची ती नात आहे.



# जालना जिल्ह्यातील बदनापूर कृषी संशोधन केंद्रास अर्थसहाय्य - कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे

**मुंबई -** वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत जालना जिल्ह्यातील बदनापूर येथील कृषी संशोधन केंद्राच्या बळकटीकरणासाठी २.८५ कोटी रुपायांचा आणि पायाभूत सुविधांचा १४.३५ कोटी रुपयांचा असे दोन्ही प्रस्ताव मंजूर करण्यात येतील, अशी माहिती कृषी मंत्री ड.माणिकराव कोकाटे यांनी विधानपरिषदेत दिली.



सदस्य सतीश चव्हाण यांनी याबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना कृषी मंत्री कोकाटे बोलत होते. यावेळी सदस्य अभिजीत वंजारी यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला. डाळवर्गीय पिके आणि कडधान्यच्या संशोधनामध्ये बदनापूर कृषी संशोधन केंद्राचे महत्वाचे योगदान आहे. या केंद्राच्या माध्यमातून तूर, हरभरा, उडीद या पिकांची देशभरात मागणी असलेली अनेक बियाणे तयार करण्यात आली आहेत. चांगले उत्पादन देणारी ही बियाणे शेतकऱ्यांच्या पसंतीस उतरत आहेत. त्यामुळे या केंद्राच्या पायाभूत सुविधांसह संशोधनासाठीही शासन अर्थसहाय्य करत आहे. या केंद्राचे दोन प्रस्ताव असून या दोन्ही प्रस्तावांना मंजुरी देऊन केंद्रास निधी दिला जाईल. तसेच या केंद्रात तयार होणारी बियाणे स्थानिक शेतकऱ्यांनाही उपलब्ध करून दिली जातील, अशी माहिती ॲड. कोकाटे यांनी विधानपरिषदेमध्ये दिली.

# नारी शक्ती महान - शकुंतला दीदी

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** 'यत्र नार्यस्तु पुज्यन्ते, रमन्ते तत्र देवताः।' असे नारी गौरवार्थ म्हटले जाते. शास्त्रांमध्ये नारीची इतकी थोरवी गायिली असतानाही प्रत्येक क्षेत्रात, प्रत्येक स्तरावर, प्रत्येक वयोगटातील नारीचे शोषण होत आहे, हे कटु सत्य आहे. तेव्हा प्रश्न पडतो की कोणती नारी अशी असू शकेल की जिचे हे गायन केले आहे.

ईश्वराने स्त्री व पुरुषाला समान, संतुलित व एकमेकांना पुरक अशा शक्ती विल्या आहेत. त्यामुळे स्त्रीला कमी लेखणे तिच्यावर अन्याय करण्यासारखे आहे, नारीकडे सुसंस्कार घडविण्याची शक्ती असल्यामुळे ती घोर पुरुष घडवू शकते. अशा नारींचा पुरुषांना अभिमान वाटायला हवा असा अभिमान बाळगणे हे देहीअभिमानी (आत्माभिमानी) वृत्तीचे लक्षण आहे. प्रत्येक यशस्वी पुरुषामागे नारी ही प्रेरणादायी शक्ती असते, ही उक्ती काही खोटो नाही. विशाल दृष्टिकोन असलेले पुरुष हे सत्य नाकारणार नाहीत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मागे वीरमाता जिजाऊंच्या रूपात स्त्री शक्ती होती. सानेगुरुजी 'शामच्या आई' मुळे महान ठरले. अशी अनेक उदाहरणे देता येतील, आई, बहीण, मुलगी, पत्नी, वहिनी, मैत्रीण अशा विविध नात्यांनी नारी पुरुषाला प्रेरणा देते, पुरुष-प्रधान संस्कृती नारीला कमी लेखत असली, तरी प्रत्यक्षात जेव्हा पुरुषाला घन हवे असते, तेव्हा तो लक्ष्मीची आराधना करतो, शक्तीची आवश्यकता असते, तेव्हा दुर्गादेवीची आराधना करतो, विद्येसाठी तो सरस्वतीची आराधना करतो, सुखशांतीसाठी त्याला संतोषीमातेची आठवण येते. स्वदेशाला मातृभूमी म्हटले जाते. स्वभाषेला

मातृभाषा म्हटले जाते. भारतातील सर्व नद्यांची नावेही नारींचीच आहेत. यावरून नारी शक्तीची थोरवी लक्षात येते.

आज नारीवर अत्याचार होत आहेत. त्यात सुशिक्षित स्त्रीयांचेही प्रमाण कमी नाही, सर्व नकारात्मक गोष्टींच्या मागे काही कारण असते. आणि ते आहे काळानुसार आवश्यक असलेल्या मूल्यनिष्ठांचा अभाव, आध्यात्मिकतेचा अभाव, आध्यात्मिकता म्हणजे धार्मिकता नाही. आध्यात्मिकता म्हणजे विशाल मनाने जगण्याची व जगू देण्याची वृत्ती जी प्रत्येक पुरुषाने व स्त्रीने धारण करण्याची आवश्यकता आहे.

स्वतःला पुरोगामी समजणारे लोक, उच्च शिक्षित लोक, आध्यात्मिकतेला नाक मुरडणारे लोक, मूल्यनिष्ठ शक्तींपासून वंचित आहेत. नकारात्मक, भ्रष्टाचारी व विघातक वृत्ती समाजात ते पसरवित आहेत, कर्मकांडांचा आध्यात्माशी काहीही संबंध नाही, विभिन्न मूल्ये आचरणात आणणे हे समंजस माणसाचे लक्षण आहे. नव्हे ते त्याचे कर्तव्य आहे. मूल्यांची धारणा स्त्री-पुरुषांना निर्भय, सत्याग्रही, विशाल दृष्टी व बुद्धीने संपन्न बनविते. म्हणून केवळ सुशिक्षित बनून चालणार नाही, तर मानवतेसाठी तसेच नारी उत्थानासाठी सुसंस्कृत बनणे आवश्यक आहे. आज उच्च शिक्षण घेऊन महिला सर्व क्षेत्रांत पुरुषांच्या बरोबरीने काम करीत आहेत. हे श्लाध्य आहे, पण त्याचबरोबर तिने आपल्या आंतरिक शक्तींचा विकास करणे आवश्यक आहे.

सुस्वभावी नारी इतर स्त्रीयांचा सन्मान करते. (मग नातेसंबंध कुठलाही असो) परंतु आजप्रत्येक नारीने स्त्री-पुरुष या भेदापलीकडे जाऊन माणुसकीच्या दृष्टिकोनातून प्रत्येकाकडे आत्मीयतेने पाहण्याची आवश्यकता आहे, हे केवळ आध्यात्मिकतेद्वारेच शक्य आहे. कुठेकुठे उच्चपदस्थ नारी पाहायला मिळतात ज्या आपल्या नावापुढे सन्माननीय पदवी लावतात. आपल्या पदाचाही उल्लेख करतात. परंतु अहंकार व उद्धटपणामुळे त्या सन्माननीय नारींच्या रांगेत बसू शकत नाहीत, अधिकार प्राप्त झालेली नारी जेव्हा भ्रष्टाचारात पुरुषांच्याही पुढे जाते, तेव्हा नारी गौखाचे सुभाषित खोटे ठरते.



लौकिक शिक्षण व आध्यात्मिक वा मूल्यनिष्ठ शिक्षण याद्वारे परिपक्व झालेली नारीमग ती कोणत्याही पदावर वा क्षेत्रात असो, आपल्या सुसंस्कारांद्वारे बंदनीय ठरते. समंजसपणा, सत्यता, नम्रता, सहनशीलता, निर्भयता इत्यादी गुण नारीने धारण केले तर तिच्याकडे वाकड्या नजरेने पाहाण्याची पुरुषांची हिंमत होणार नाही. तिची निर्णय शक्ती जागृत असेल तर योग्य वेळी ती योग्य निर्णय घेईल. नारीची साधी राहणी व उच्च विचारसरणी हे तिचे सौंदर्य आहे. श्रेष्ठ कर्तृत्व हा तिचा दागिना आहे.

वर्तमानसमयी सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी घराघरांतून सुसंस्कार घडविणे हे प्रत्येक नारीचे कर्तव्य आहे. ते पार पाडल्यानेच ती वंदनीय ठरणार आहे. म्हणून मुलामुलींना लहानपणापासून समान वागणूक देऊन त्यांच्यामध्ये परस्परांविषयी आदराची भावना निर्माण करणे हे एक प्रकारे नवसमाज निर्माण करण्यासारखे आहे. संस्कार विविध माध्यमांतून होत असतात, सामुहिक संस्कार घडविण्यासाठी, मुलांचा सांभाळ करण्यासाठी, त्यांना पाळणाघरात ठेवले जाते. संस्कार केंद्रांतही त्यांना पाठविणे ही काळाची गरज आहे. सुसंस्कारांमुळेच घरात व घराबाहेर सामंजस्ययुक्त सामाजिक परिवर्तन घडून येऊ शकते. हे परिवर्तन नारीचे गौरवयुक्त गायन यत्र नार्यस्तु पुज्यन्ते, रमन्ते तत्र देवताः । अबाधित ठेवणार आहे.

## राज्यातील कर्मचाऱ्यांचे माहे मार्चचे वेतन रमजान ईद व गुढीपाडव्या पुर्वी अदा करावे

### मराठवाडा शिक्षक संघाची मागणी

**परळी । प्रतिनिधी -** राज्यातील शासकीय/निमशासकीय कर्मचारी, शिक्षक,प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे माहे मार्च चे वेतन रमजान ईद व गुढीपाडव्या पुर्वी दिनांक २५ मार्च पर्यंत अदा करावे अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अर्थमंत्री अजीत दादा पवार यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

संघटनेचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य बंडू अघाव यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, मुस्लिम धर्मातील सर्व सणात मोठा,पवित्र व महत्त्वाचा मानला जाणारा सण रमजान ईद ३१ मार्च रोजी व हिंदूचा नवीन मराठी वर्षाची सुरुवात करणारा गुढीपाडवा हा सण ३० मार्च रोजी साजरे होत आहेत. हे दोन्ही सण राज्यात मोठ्या उत्साहात व आनंदात साजरे केले जातात.त्यामुळे बाजार पेठेत खरेदीची मोठी अर्थिक उलाढाल होते.म्हणून हे दोन्ही सण मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरे करता यावेत यासाठी राज्यातील शासकिय, निमशासकीय कर्मचारी,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे माहे मार्च चे वेतन २५ मार्च २०२५ पर्यंत अदा करावे.अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने संघटनेचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांनी लेखी निवेदनाद्वारे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजीत दादा पवार यांच्याकडे केली आसल्याची माहिती संघटनेचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य बंडू अघाव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

प्रसिध्दी पत्रकावर संघटनेचे केंद्रीय कार्यकारणी उपाध्यक्ष न्यानोबा वरवट्टे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रेमदास राठोड, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य कुरेशी, जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे, जिल्हा उपाध्यक्ष जगन वाघमोडे, जिल्हा उपाध्यक्ष भीमाशंकर शिंदे, जिल्हा सचिव संजय येळवंते, जिल्हा मार्गदर्शक मारुती तेगंमपुरे, मुंडे सर, काकड सर, सय्यद सर, जाफराबाद तालुका मार्गदर्शक प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, सुधाकर डोईफोडे, अचलखांब, भगवान पालकर, सय्यद सर, जालना जिल्ह्यातील सर्व मराठवाडा शिक्षक संघटनेचे तालुका अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव कार्यकारणी सदस्य यांनी आवाहन केले आहे.

## समृद्धी महामार्गवर सळई घेऊन जाणाऱ्या ट्रकला दुसरा आयशर ट्रक जोराने धडकला




**जालना । प्रतिनिधी -** सळई घेऊन जाणाऱ्या ट्रकला दुसरा आयशर ट्रक जोराने धडकून भीषण अपघात घडलाय. या घटनेत आयशर ट्रक चालकाचा जागीच मृत्यू झाला असून क्लिनर गंभीर जखमी झालाय. जालन्याच्या समृद्धी म हामार्गावरी चॅनल क्र. ३८३.९ वर रात्री अडीच वाजेच्या सुमारास ही दुर्दैवी घटना घडलीय. अंकुरसिंग असं मयत ट्रॅक चालकाचे नाव असून तो उत्तर प्रदेश राज्यातील नगीना येथील रहिवासी आहे. तर लतिफसिंग (रा. चिल्लेपुर, उत्तर प्रदेश) असं जखमी क्लिनरचे नावं आहे. आयशर ट्रक क्रमांक Mh 17 BY 6980 हा रायपूर हून छत्रपती संभाजीनगर कडे निघाला होता. यादरम्यान जालना हद्दीतील समृद्धी महामार्गावर सदरील आयशर ट्रक चळईची वाहतूक करणाऱ्या ट्रक क्रमांक Mh 21 BH 4863 ला पाठीम ागून जोराने धडकला. यात सळई अंगात घुसून आयशर ट्रक चालक अंकुरसिंग याचा जागीच मृत्यू झाला तर क्लिनर गंभीर जखमी झाला आहे. या घटनेनंतर घेऊन जाणाऱ्या ट्रकचा चालक प्रसार झाला. या घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस केंद्राचे पोलीस उपनिरि.अशोक काळे,पो. हेड का.बिऱ्हाडे, पो.अमंलादार निकाळजे, चडऋ चे जवानरवी पवार व राठोड, तसेच म्बुलन्स चालक आनंद भोरे डॉ अमोल देहाडकर ठळत संदीप गरजे, व वाघ खंदारे, बाचकर, यांनी घटनास्थळी धाव घेऊन अपघातग्रस्त वाहनांना मदत करून महामार्गावरील वाहतूक सुरळीत केली. तातडीने जखमी क्लीनरला रुग्णालयात उपचारासाठी पाठवले तर मयताचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालय जालना येथे पाठविला आहे.

## बुधवारी जालना येथे प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** नोकरीच्या शोधात असलेल्या जालना जिल्ह्यातील युवक-युवतींना विविध खासगी कंपन्या, कारखाने, उद्योग-व्यवसाय आणि आस्थापना यांच्याकडील रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याच्या उद्देशाने तसेच रोजगार सहाय्यासाठी विशेष मोहिम सुरू करण्यात आली आहे. तरी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाकडून जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालना येथे बुधवार दि.१९ मार्च २०२५ रोजी प्लेसमेंट ड्राईव्ह -जागेवर निवड संधीचे आयोजन सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत करण्यात आले आहे, अशी माहिती कौशल्य विकास रोजगार व उद्योजकताचे सहायक आयुक्त गणेश चिमणकर यांनी दिली आहे. म्हस्के टेक्नॉलॉजीज प्रा.लि.जालना यांचे आय.टी.आय कोणताही ट्रेड उत्तीर्ण करिता ऑपरेटरची २ पदे, आय.टी.आय इलेक्ट्रिशीयन उत्तीर्ण करिता ३ पदे तसेच भूमी कॉटेक्स प्रा.लिमिटेड जालना यांची पदवी उत्तीर्ण करिता सुपरवायझरची ३ पदे, तसेच लेखा विषयक अनुभव असलेल्या बी.कॉम उत्तीर्ण करिता लेखापाल करिता ३ पदे, कोणतीही पदवीधर उत्तीर्ण करिता वजन काटा ऑपरेटर साठी १ पद, आय.टी.आय उत्तीर्ण मशीन हेल्परसाठी ३ पदे, बी.एस्सी कृषी उत्तीर्णसाठी मार्केटिंग प्रतिनिधीसाठी ४ पदे तसेच दहावी उत्तीर्णकरिता डाटा एन्ट्री कार्यालयीन सहायक पदासाठी १ अशी एकुण २० रिक्तपदे प्राप्त झालेली आहेत. याकरीता नोकरी इच्छुक पात्रता धारक उपस्थित होणाऱ्या उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येवून जागेवरच निवडीची संधी उपलब्ध आहे. जालना जिल्ह्यातील नोकरी इच्छुकांनी या संधीचा लाभ व अधिक माहिती घेण्यासाठी विभागाच्या www.rojgar.mahaswayam.gov.in या वेबसाईटला भेट द्यावी. यापूर्वी नोंदणी केली नसल्यास प्रथम आपली नोंदणी करावी आणि होम पेज वरील नोकरी साधक लॉगिन मधून आपल्या युजर आयडी व पासवर्डच्या आधारे लॉग ईन करावे. त्यानंतर डॅसबोर्ड मधील पंडित दीनदयाळ उपाध्याय जॉब फेअर या बटनावर क्लिक करून जालना जिल्हा निवडून त्यातील प्लेसमेंट ड्राईव्ह-५ पर्यायाची निवड करावी. उद्योजक, नियोक्तानिहाय त्यांच्याकडील रिक्त पदांची माहिती घ्यावी. कागदपत्रे कंपनींना देण्यासाठी छायाप्रती संच सोबत ठेवून बुधवार दि. १९ मार्च २०२५ रोजी सकाळी ११ ते दु. २ प्रत्यक्ष मुलाखतीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकतामार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर, प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, जालना येथे उपस्थित राहून या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये सहभागी व्हावे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.